आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातमीपत्र
सकाळी 07 वाजून 10 मि.

दिनांक : 17.11.2026 **वार : मंगळवार**

---

1. दिवंगत अजित पवार ग्रामीण विकास आणि सहकार क्षेत्रातील ज्ञानकोष असल्याचं-केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
2. अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीचा अंतिम अहवाल लवकर जाहीर करण्याची मुख्यमंत्र्यांची केंद्राला विनंती
3. पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळातील ऐतिहासिक दस्तऐवजांच्या डिजिटायझेशन प्रकल्पाचं केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या हस्ते लोकार्पण आणि
4. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीमध्ये अनुसुचित जाती-जमाती आरक्षणाच्या चक्राकार धोरणामध्ये हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

<u>अमित शाह-झेडपी</u>

दिवंगत अजितदादा पवार हे ग्रामीण विकास आणि सहकार क्षेत्राचे चालते-बोलते ज्ञानकोष होते; त्यांची कार्यपद्धती नव्या पिढीतील राजकीय नेतृत्वासाठी एका विद्यापीठाप्रमाणे आहे, अशा शब्दांत केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शहा यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्याचा गौरव केला. पुणे जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात उभारण्यात आलेल्या लोकनेते अजितदादा पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचं अनावरण शहा यांच्या हस्ते काल झालं; त्यावेळी ते बोलत होते. याच कार्यक्रमात जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वाराचं -'अजितदादा पवार प्रवेशद्वार' असं नामकरण करण्यात आलं. यावेळी बोलताना अमित शहा म्हणाले.....

दूध संघ हो, पैक्स हो, चीनी कारखाने हो, नागरिक कोआपरेटिव बैंक हो, या जिला कोआपरेटिव बैंक, हर सहकारी क्षेत्र की समस्या इसका एनसाइक्लोपीडिया अगर भारत भर में ढूंढना है, तो एक ही नाम आता है, श्री अजित पवार। ये एक प्रकार से तभी हो पाता है जब कोआपरेटिव सेक्टर का सहकारिता क्षेत्र का महत्व मालूम हो, क्यूँकी कोआपरेटिव सेक्टर की कमियाँ खूबियाँ और उसका एडमिनिस्ट्रेशन कोई पुस्तक में कोई पढ़ नहीं सकता है। वो तभी आपको मालूम पड़ सकता है, जब आप इसके अंदर नीचे से ऊपर तक जाते हैं, तो एक प्रकार से महाराष्ट्र के कोआपरेटिव सेक्टर को उन्होंने बहुत अच्छे तरीके से इसको आगे बढ़ाने के लिए इसकी दिक्कतों को समाप्त करने के लिए परिश्रम भी किया।

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, एकनाथ शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. राज्याचे अर्थमंत्री म्हणून काम करताना अजित पवार यांनी कठीण आर्थिक परिस्थितीतही राज्याची आर्थिक शिस्त कायम राखली, असं मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीचा अंतिम अहवाल लवकर जाहीर करण्याची विनंती त्यांनी अमित शहा यांना केली; ते म्हणाले...

एक मोठी चौकशी चाललेली आहे, त्याच्यामध्ये अमेरिकेचे वेगवेगळ्या राज्यांचे राष्ट्रांचे लोकं देखील ती चौकशी करत आहेत, पण कुठेतरी महाराष्ट्रातल्या सामान्य व्यक्तीच्या मनातला संभ्रम दूर झाला पाहिजे. हा जो काही अहवाल आहे, हा अहवाल लवकरात लवकर आला पाहिजे, जेणेकरून कोणी याच्यामध्ये दोषी असेल तर त्याला आम्हाला फासावर लटकवता आलं पाहिजे आणि समजा याच्यामध्ये हा जर अपघात असेल तर किमान हा जो आमच्या सामान्य माणसाच्या मनातला आक्रोश आहे त्या आक्रोशावर काहीतरी फुंकर पडली पाहिजे, या दृष्टीनं आज मी अमितभाईना ही

विनंती देखील केली आणि अमितभाईंनी देखील आज त्या ठिकाणी आश्वस्त केलेलं आहे, की ते स्वतः लक्ष घालून चौकशीचा जो काही अहवाल आहे हा अहवाल लवकरात लवकर या ठिकाणी आणण्यात येईल अशा प्रकारचं त्यांनी सांगितलेलं आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, यावेळी आपलं मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या....

महायुती सरकारमध्येही आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब आणि दादांचे अत्यंत स्नेहाचे आणि जिवहाळ्याचे संबंध होते. महाराष्ट्राच्या तमाम जनतेसाठी एकत्रित काम करून आपल्या राज्याला सदैव प्रगतीपथावर ठेवण्याचं ध्येय त्यांचं होतं, हे आपल्याला सगळ्यांना माहिती आहे. आदरणीय मोदी साहेबांच्या नेतृत्वाखाली हे सगळे तिघेजण अतिशय उत्कृष्ट समन्वय ठेवून राज्याच्या विकासाचा रथ चालवत होते. आदरणीय दादांच्या पश्चात या सर्वांकडूनच मला पूर्वीपेक्षाही जास्त सहकार्य मिळत आहे.

भारत इतिहास

पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या दुर्मिळ डिजिटायझेशन प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचं लोकार्पण केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते काल झालं. भारत इतिहास संशोधक मंडळ गेल्या 116 वर्षांपासून इतिहास संशोधनाचं महत्त्वपूर्ण कार्य करत आहे. मंडळाकडे जतन केलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांच्या माध्यमातून मराठ्यांचा गौरवशाली इतिहास जगासमोर आणण्याच्या उद्देशाने हा डिजिटायझेशन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या उपस्थितीत 2021 मध्ये या प्रकल्पाचा प्रारंभ करण्यात आला होता. त्यातील पहिल्या टप्प्याचं लोकार्पण काल करण्यात आलं.

अमित शाह-मुथ्था फाउंडेशन

केंद्रीय गृह मंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यातील भारतीय जैन संघटना आणि शांतीलाल मुथ्था फाउंडेशनच्या मुख्यालयालाही भेट दिली. दोन्ही संस्थांच्या 42 वर्षांच्या प्रवासाची, सामाजिक योगदानाची आणि विविध उपक्रमांची माहिती घेऊन शहा यांनी या संस्थांच्या कार्याचं कौतुक केलं.

सर्वोच्च न्यायालय-मुंबई

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांमधल्या अनुसुचित जाती जमाती आरक्षणाच्या, चक्राकार धोरणाच्या नियमात हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयानं नकार दिला आहे. हा धोरणात्मक निर्णय असल्याचं सांगत सर्वोच्च न्यायालयानं, अनुसूचित जाती-जमातीसाठी आरक्षित जागांसाठीचं चक्रानुक्रम धोरण बदलण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली. मात्र, याचिकाकर्त्यांना राज्य सरकारकडे दाद मागण्याची मुभा न्यायालयानं दिली आहे. राज्य सरकारनं, गेल्या वर्षी हे नियम लागू केले होते. त्यानंतर होणाऱ्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर या आरक्षण धोरणाची अंमलबजावणी होणार होती. मात्र, या नियमांमुळे विद्यमान आरक्षण पद्धत विस्कळीत होते आणि त्या मतदारसंघातून निवडणूक लढवायला इच्छुक असणाऱ्या उमेदवारांचं भवितव्य धोक्यात येतं असा दावा याचिकाकर्त्यांनी केला होता.

दुष्काळ

राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, रोजगार हमी योजना आणि 'व्हीबी जी राम जी' अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचा रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी काल दूरस्थ पद्धतीने आढावा घेतला. या कामांची सर्व स्तरांवर प्रभावी अंमलबजावणी करावी, दुष्काळी भागातील एकही पात्र कुटुंब रोजगारापासून वंचित राहू नये, रोजगार निर्मितीबरोबरच जलसंधारण, चारा उपलब्धता आणि ग्रामीण पायाभूत सुविधांच्या निर्मितीला प्राधान्य द्यावं असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

चिपी विमानतळ-सिंधुदुर्ग

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या चिपी विमानतळावरून, सिंधुदुर्ग ते मुंबई विमानसेवा कालपासून पुन्हा सुरू झाली. पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते पहिल्या प्रवाशाला बोर्डिंग पास देण्यात आला. याकरता, राज्य सरकार, Viability Gap Funding

अंतर्गत, विमान कंपनीला, प्रत्येक आसनामागे 6 हजार 200 रुपये देणार आहे. यासाठी पावणे 177 कोटी रुपयांच्या खर्चाला सरकारनं मंजुरी दिली असून त्यासाठीचा शासन आदेश जारी करण्यात आला आहे.

इफ्फी-मुंबई

57 व्या इफ्फी चित्रपट महोत्सवात समकालीन फीचर आणि नॉनफीचर मराठी चित्रपट दाखवण्यात येणार आहेत. 'आदि अनंत', प्रवीण तरडे 'देऊळ बंद 2' आणि 'तिघी' हे चित्रपट या महोत्सवात प्रदर्शित होणार आहेत. याखेरीज अभिनेता सूर्यकांत यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'साधी माणसं' या त्यांनी अभिनित चित्रपटाचा खेळ होणार आहे. तसंच, ज्येष्ठ अभिनेता नाना पाटेकर यांना आदरांजली वाहण्यासाठी त्यांचे 'दीक्षा' आणि 'नटसम्राट' हे चित्रपट दाखवले जाणार आहेत.

संजीवन समाधी

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्याला येत्या 2 डिसेंबरपासून आळंदीमध्ये सुरुवात होणार आहे. गुरुवर्य हैबतबाबा यांच्या पायरी पूजनानं या सोहळ्याचा प्रारंभ होईल. 6 डिसेंबरला माउलींचा संजीवन समाधी दिन सोहळा साजरा होणार आहे. या निमित्ताने 29 नोव्हेंबरपासून अखंड हरिनाम सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे.

निंबाळकर-शहा भेट-धाराशीव

मारठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी काल पुण्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. यावेळी उभय नेत्यांमध्ये मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांसमोरील आर्थिक अडचणी तसंच आगामी काळात निर्माण होऊ शकणाऱ्या पाणी आणि चाराटंचाईच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांना आवश्यक मदत उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने प्राधान्याने उपाययोजना कराव्यात अशी विनंती निंबाळकर यांनी यावेळी केली.

कामगार मृत्यू- सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातल्या आंबे इथं विहीर खोदकामात दगड मातीचा ढिगारा कोसळून झालेल्या दुर्घटनेत 4 कामगारांचा मृत्यू झाल्याची माहिती काल जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. 50 फूट खोल विहीर खणताना जमीन खचल्यानं मातीचा ढिगारा कोसळला. त्याखाली हे कामगार अडकले होते. मृत कामगारांच्या कुटुंबांना प्रत्येकी 5 लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. वाशिम जिल्ह्यातल्या अनसिंगजवळ, नवीन विहिरीचं खोदकाम करताना, विहिरीची माती कोसळल्यानं दोन मजुरांचा मृत्यू झाला.

निधन-आमदार सावंत

आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते आणि माजी आमदार ॲड. लक्ष्मण तुकाराम तथा एल. टी. सावंत यांचं काल पुण्यात निधन झालं. ते 82 वर्षांचे होते. आधीच्या बोपोडी विधानसभा मतदारसंघाचे ते पहिले आमदार होते. 1978 मध्ये ते अपक्ष म्हणून निवडून आले होते. वकिली पेशा सांभाळत त्यांनी समाजसेवा आणि सार्वजनिक जीवनात महत्वाचं योगदान दिलं. त्यांच्या पार्थिव देहावर काल अंत्यसंस्कार करण्यात आले.

हवामान

राज्याच्या सर्वच भागांमध्ये काल हवामान कोरडं होतं. जळगावमध्ये काल सर्वात कमी किमान तापमान 12 पूर्णांक 7 अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. आजही हवामान कोरडं राहण्याची शक्यता आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.